| MHKO030096422026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.८५४/२०२६** (अश्वीनी संदिप सुर्यवंशी विरुध्द म.शासन व इतर.) |
|---|---|

## निशाणी क्र.१ खाली आदेश.

०१. सदरचा अर्ज अर्जदार सौ. अश्विनी संदीप सुर्यवंशी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ नुसार जप्त तिरुमाला किराणा मॉल हे मोहरबंद (सील) केलेले आहे ते काढून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जदारने प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी सदर गुन्हयातील आरोपी यांचे मालकीचे तिरुमला किराणा मॉल, १३२५/२८, ई वॉर्ड, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर येथील मार्च–२०२३ मध्ये भाडे तत्वावर घेतलेले आहे. त्याठिकाणी अर्जदार किराणा व्यवसायाकरीता अन्न व प्रशासन विभाग यांचेकडून रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट व व्यवसाय चालविण्यासाठी उदयम रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट देखील घेतलेले आहे. सदरहू तिरुमला किराणा मॉलमध्ये अर्जदार यांनी सर्व प्रकारचा दैंनदिन वापराच्या डाळी, गहू, तांदूळ तसेच जिवनावश्यक सर्व प्रकारच्या वस्तु फ्रिजमध्ये असणारे दुध, दही, ताक व इतर दुग्धजन्य पदार्थ माल विक्रीसाठी ठेवतात. सदरहू किराणा मॉल बंद राहिलेने अर्जदार यांचे फार मोठे आर्थीक नुकसान होत आहे. त्यामध्ये एकूण रक्कम रु.३ ते ४ लाखाचा माल जप्त आहे त्यामध्ये बराचसा माल हा नाशवंत स्वरुपाचा असून तो लवकरात लवकर विक्री नाही केला तर अर्जदाराचे लाखामध्ये नुकसान होणार आहे. दुकान मालक ओंकार पाटील याचे दुकानामध्ये कायम येणे जाणे असते. अर्जदार स्वत: कधीही बेकायदेशीर जप्त माल (गुटखा) विकत नव्हत्या. तसेच दुकानाचे मालक हे नेहमी दुकानात ये जा करत असल्यामुळे सदर प्रतिबंधीत जप्त मुददेमाल कधी व केव्हा दुकानात ठेवला हे अर्जदार यांना माहित नव्हते. आरोपी ओंकार मानसिंग पाटील हा सदर गुन्हयामध्ये आरोपी असून सदरचे दुकान अर्जदार चालवित असताना अन्न व प्रशासन विभागाच्या

अधिका-यांनी जप्त मुददेमाल गुटखा व सुगंधी पदार्थ व इतर साठा जप्त केला आहे व त्यानंतर ओंकार मानसिंग पाटील यांचे विरुध्द राजारामपुरी पोलीस स्टेशन गुन्हा क्र. ३४६/२०२६ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम २६(२)(i), २६(२)(iv), २६(३)(e), ३०(२)(a), ५९ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२३, २७४, २७५, १२३ प्रमाणे गुन्हा नोंद केला.

०३. अर्जदार व त्यांचे कुटूंबिय सदर दुकानातील व्यवसायावर अवलंबून असून सदरचे दुकान सील अवस्थेत राहिलेस त्यांचे कुटूंबियाचे आर्थिक व मानसिक न भरुन येणारे नुकसान होणार आहे. अर्जदार यांचे दुकानात इतर वस्तूंचा देखील साठा आहे. सदरचे पदार्थ हे नाशवंत असलेले दुकान बंद अवस्थेत राहिलेस त्या पदार्थाचे नुकसान होणार आहे. या व्यवसाया व्यतिरिक्त अर्जदार यांचा अन्य कोणताही व्यवहार नाही. अर्जदार यांनी केव्हाही वि.प. यांनी दाखल केलेप्रमाणे अन्न सुरक्षा व मानके अधिनियम व भारतीय दंड संहिता कलम याचे केंव्हाही उल्लघंन केलेले नाही. अर्जदार यांनी एफ.आय.आर मध्ये नमुद केलेप्रमाणे कोणत्याही वस्तुंची विक्री अगर साठा केलेला नाही. तसेच यापुढे सुध्दा अन्न व सुरक्षा व मानदे अधिनियम यांचा भंग होईल अशा कोणत्याही वस्तुंचा साठा करणार नाहीत अगर केलेला नाही. मे कोर्टांनी अर्जदार यांचे दुकानाचे सील काढणेबाबत आदेश केलेस अर्जदार हे सदरचे दुकान आहे त्या परस्थितीत ठेवतील. त्यामध्ये कोणताही बदल करणार नाही अगर दुकानाची विक्री, तबदीली व कोणताही व्यवहार करणार नाही व अटी शर्तीचे पालन करण्यास तयार आहेत.

०४. सरकारी वकील यांनी आपले म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, अर्जदार हे मार्च-२०२३ पासून आरोपीचे मालकीचा तिरुमला किराणा मॉल हे भाडेस्वरुपात घेतले असून त्याचा पुरावा सादर केला नाही. गुन्हयाचा तपास अद्याप सुरु आहे. तसेच दुकानाचे सिल उघडलेस आरोपीकडून पुन्हा अश्याच प्रकारची विक्री, साठा अथवा जप्त मालाची विल्हेवाट व पुरावे नष्ट करण्याची शक्यता

आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०५. सामनेवाला क्र.१ तपासी अंमलदार यांनी (निशाणी क्र.६) त्यांचे म्हणणे दाखल करुन गुन्हयाचा तपास सुरु आहे. तसेच तिरुमाला किराणा मॉल हे दुकान सिल असून ते खुले केल्यास यातील आरोपी हे परत सदर किराणा दुकानाच्या माध्यमातुन गुटखा पानमसाला सुगंधी सुपारी तंबाखु मावा विक्री करण्याची तसेच साठा करुन ठेवण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सबब, किराणा मॉल दुकानाचे सिल खुले करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

०६. सामनेवाला क्र.२ यांनी (निशाणी क्र.५) त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जाला सक्त हरकत घेतलेली आहे. सामनेवाला यांचे म्हणणे की, महाराष्ट्र सरकार तर्फे अन्न सुरक्षा व मानदे कायदयाच्या तरतुदींनुसार मला प्रादर असलेल्या कायदेशीर शक्ती अन्वये मी दिनांक ०९.०६.२०२६ रोजी, श्रीमती अश्विनी संदिप सुर्यवंशी यांच्या मालकीच्या मे.तिरुमला किरणा मॉल या पेढीची तपासणी केली. त्यावेळी सदर पेढीत श्री. ओमकार मानसिंग पाटील हे विक्रेता म्हणून हजर होते व त्या पेढीमधून महाराष्ट्र राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी सार्वजनिक आरोग्याच्या हिताने जारी केलेला प्रतिबंध आदेश क्रमांक असुमाका/अधिसुचना/४११/२०२५/७ दि.१६/०७/२०२५ नुसार लोक आरोग्य हितास्तव महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेले गुटखा, पान मसाला, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, आपमिश्रके युक्त उत्पादित चघळण्याची तंबाखू, खर्रा, मावा इत्यादी पैकी सुगंधीत तंबाखू सुंगधीत सुपारी मिश्रीत मावा हे प्रतिबंधीत पदार्थ छुप्या विक्रीकरता साठविलेले आढळून आले. सदर विक्रेता वरीलप्रमाणे पदार्थ पेढीत बाळगून लोकांना विकत होते. म्हणून सदर पेढीला सील करुन श्री.ओमकार मानसिंग पाटील यांचेसह प्रकरणांची संपुर्ण चौकशी होण्याकरीता राजारामपुरी पोलीस ठाणे येथे प्रथम खबर अहवाल सादर केला.

०७. सदर प्रकरणात नमुद पेढीमध्ये खादयपदार्थासोबत इतर प्रतिबंधीत असलेले तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्री होत असल्याचे आढळून आले. प्रतिबंधीत आदेश क्रमांक. असुमाका/अधिसुचना/४११/२०२५/७ दि.१६/०७/२०२५ अन्वये महाराष्ट्र राज्यात गुटखा, पानमसाला किंवा अंतिमतः गुटखा किंवा पानमसाला गठीत होवू शकेल असा पदार्थ, सुगंधित किंवा स्वादिष्ट सुपारी/तंबाखू इत्यादीचे उत्पादन/साठा/वितरण/वाहतूक/तसेच विक्री यावर बंदी घातलेली आहे. सदर आदेशानुसार अशा ठिकाणी अन्नपदार्थची विक्री होत असल्यास देण्यात आलेला अन्नपरवाना/नोंदणी रद्द करण्यात येईल. तसेच व्यावसायिकावर अन्न सुरक्षा व मानके कायदयाचे कलम ३१ नुसार कारवाई करण्यात केली जाईल. सदर प्रकरणातील पेढीकडे अन्नपदार्थ विक्रीसाठी लागणारा नोंदणी उपलब्ध असल्याचे आढळले. सदर अन्न व्यवसायासाठीचे उपरोक्त ठिकाणचे अन्न सुरक्षा नोंदणी प्रमाणपत्र क्र.२१५२६०४२०००२२६ मुदत दिनांक १५/०२/२०२५ हे जन आरोग्याच्या हिताचे दृष्टीने सहायक आयुकत अन्न कोल्हापूर यांनी रदद केले आहे. मा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, म. राज्य यांचे ज्ञापन क्र.असुका/प्र.अ./कयोचि/३४४–१७/०७ दिनांक ०६/०४/२०१७ नुसार प्रतिबंधित अन्न पदार्थांची वाहतुक अथवा विक्री/साठा करणा–या आस्थापना सील करुन पुढील कारवाई करण्याचे आदेश अन्न सुरक्षा अधिकारी यांना देण्यात आले आहेत.

०८. सदर पेढी ही लोक वर्दळीच्या चौकामध्ये, मुख्य बाजारपेठेत गर्दीच्या ठिकाणी आहे आणि सदर ठिकाणाहुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले पदार्थ या पुढे सुध्दा विक्री होण्याची दाट शक्यता आहे. तसेच सदर हजर व्यक्ती ओमकार मानसिंग पाटील यांना पुढील तपासकामी कोणतीही मदत केली नाही. उडवाउडवीची उत्तरे दिली असल्याने व सार्वजनिक जन आरोग्य हितार्थ सदर पेढील खुली करण्यात येवू नये.

०९.          सदर प्रकरणातील प्रतिबंधीत पदार्थांच्या पुरवठादाराबाबत विचारणा केली असता ओमकार मानसिंग पाटील यांनी त्याचे खरेदी बील उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे. तसेच गैरअर्जदार यांनी महाराष्ट्र शासनाने राज्यभरात गुटखा, पान मसाला, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, आपमिश्रके युक्त उत्पादित चघळण्याची तंबाखू, खर्रा, मावा या स्वरुपात किंवा अन्य कोणतीही नावाने संबोधले जाणारे अन्न पदार्थाचे उत्पादन, साठा, वितरण व विक्री बंदी असल्याबाबत पुर्ण कल्पना असल्याचे मान्य केले आहे. आज अखेर सदर प्रकरणातील अर्जदार तथा आरोपी यांनी प्रकरणातील प्रतिबंधीत केलेले पदार्थ पेढीतून विक्रीकरीता कुणी पुरवठा केला, त्याचे खरेदी बिल किंवा अन्य कसलाच तपशील सादर केलेला नाही. सदर पेढी सील करण्यापुर्वी अर्जदार यांना त्यांच्या पेढीत विक्रीसाठी साठा केलेली नाशवंत बेकरी उत्पादने, बिस्कीट, गोळया वगैरे अन्न पदार्थ पेढीच्या बाहेर घेण्याची सुचना केलेली होती. वरील कारणास्तव अर्ज नामंजूर करण्याबाबतची विनंती केलेली आहे.

१०.          अर्जासोबत अर्जदाराने ऑनलाईन पध्दतीने दाखल केलेले कागदपत्रे पाहता अर्जदाराने निशाणी ३/३ सोबत परवाना क्र.२१५२६०४२०००२२६ या परवान्याची झेरॉक्स प्रत दाखल केली असून सदरचा परवाना हा अर्जदारच्या नावे अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ नुसार दिल्याचे दिसून येते. तसेच निशाणी ३/४ सोबत उदयम रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्राची प्रत दाखल केली असून ते तिरुमला किराणा मॉल अशा नावाने असल्याचे निदर्शनास येते. अर्जदार यांनी नि. ३/१ सोबत प्रथम खबरी अहवालाची प्रत दाखल केली आहे. त्यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदारच्या दुकानात तपासणीच्या वेळी विविध कंपन्यांचे प्रतिबंधीत पान मसाले आढळून आले. ते पदार्थ जप्त करण्यात आलेले असून त्या दुकानाला सिल केलेले आहे. अर्जदार या सदरचे दुकान हे भाडयाने चालवितात. परंतू, त्याबाबत त्यांच्याकडे कुठलाही भाडेकरार नाही. त्यासंबधी अर्जदारातर्फे दुकान मालकाचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल करण्यात आले आहे.

११. वरील प्रमाणे परस्थितीनुसार अर्जदार यांचे दुकान मोहरबंद केलेले असल्याचे कागदपत्रावरुन व सामनेवाला यांनी दिलेल्या म्हणण्यावरुन स्पष्ट होते. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी अन्न व सुरक्षा मानदे कायदा २००६ चे कलम ३८ (१)(ब) सहवाचन नियम २.१.४(i) नुसार अन्न सुरक्षा अधिकारी यांनी जप्त मुद्देमाल त्याच जागेत अन्न व्यापार दुकान चालविणा–याचे ताब्यात नमुना घेवून मोहरबंद करुन ठेवल्यास अथवा अन्न व्यापार दुकान चालविणा–याचे ताब्यात वस्तू दिली म्हणून बंधपत्र करुन घेतल्यास व त्या दुकानात वस्तू ठेवल्यास त्या दुकान जागेला मोहरबंद करु शकतो अशी तरतुद असल्याचे दिसते.

१२. अर्जदाराने दाखल केलेल्या सदर कागदपत्रांवरुन सदर दुकानाचा परवाना हा अर्जदाराच्या नावे असून अर्जदाराच्या दुकानाला सामनेवाला यांनी मोहरबंद केल्याचे दिसून येते. तसेच अर्जदाराच्या म्हणण्यानुसार इतर वस्तूचा साठा आहे ज्या नाशवंत आहेत.

१३. प्रस्तुतच्या प्रकरणात ज्या दुकानाला मोहरबंद केलेले आहे त्या दुकानामध्ये त्यांनी तो माल ठेवलेला नाही. त्यामुळे दुकानामध्ये प्रतिबंधीत माल नसताना दुकान मोहरबंद करण्याचा त्यांना कायदयाने कोणतेही अधिकार असल्याचे दिसून येत नाही. यावरुन अन्न सुरक्षा अधिकारी यांनी अधिकाराबाहेर जावून अर्जदार यांचे दुकान मोहरबंद केल्याचे दिसून येत नाही. अन्न सुरक्षा अधिकारी यांना दुकानात वर नमुद नियमानुसार जप्त माल ठेवला नसल्याने त्यांना दुकान मोहरबंद करण्याचा अधिकार नसल्यामुळे अर्जदार हे दुकानाचे मोहरबंद काढून मिळण्यास पात्र असल्याचे दिसतात. तसेच सदरील दुकानाच्या व्यवसायावर अर्जदार व त्यांच्या कुटूंबियांचा उदरनिर्वाह असल्याने व ते बंद राहिल्यास अर्जदार व त्यांचे कुटूंबियांचे आर्थीक व मानसिक न भरुन येणारे नुकसान होईल ही अर्जदारची भिती रास्त वाटते. सदरील दुकान सील बंद करुन महिन्याचा कालावधी होवून गेलेला आहे. त्यामुळे आवश्यक तो कालावधी सामनेवाला यांना तपासकामी मिळालेचे दिसून येते.

१४.    सबब वरील कारणास्तव सामनेवाला क्र.२ यांनी अर्जदाराचे दुकान बंद ठेवल्यामुळे अर्जदाराच्या उपजिविकेचे साधनांवर बंदी घातल्यासारखे होईल व ते योग्य राहणार नाही. सबब न्याय हितास्तव अर्जदारचा अर्ज मंजूर करणे योग्य राहील. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१ अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२ सामनेवाला क्र.२ अन्न सुरक्षा अधिकारी व अन्न औषध प्रशासन, कोल्हापूर जि.कोल्हापूर यांनी तात्काळ अर्जदार यांचे ताब्यातील तिरुमला किराणा मॉल, १३२५/२८, ई वॉर्ड, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर या दुकानाचे मोहरबंद काढून दुकानाचा व त्यातील प्रतिबंधीत वस्तु/पदार्थ वगळता सर्व वस्तुंचा ताबा अर्जदार यांना द्यावा.

३ अर्जदार यांनी रुपये १००/– च्या मुद्रांकावर ते तिरुमला किराणा मॉल, १३२५/२८, ई वॉर्ड, शिवाजी उद्यमनगर, कोलहापूर या दुकानात अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नुसार प्रतिबंधीत केलेला माल विक्रीसाठी ठेवणार नाही असे बंधपत्र व प्रतिज्ञापत्र दयावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ANIKET MUSALE
Date: 2026.07.24 16:28:13 +0530

( अ.वि. मुसळे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.३,
कोल्हापूर.

कोल्हापूर
दिनांक : २४/०७/२०२६